
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१७ नोव्हेंबर २०२४




## विधानसभा निवडणुकीत महायुतीला १७० हून अधिक जागा मिळणारच : मुख्यमंत्री




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, दापोली :** दापोली मतदार संघाची निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर आहे. महायुतीच्या सरकारने येथील आमदार योगेश कदम यांना साडेतीन हजार कोटी पेक्षा जास्त निधी दिला आहे. या विधानसभा निवडणुकीत महायुतीला १७० हून अधिक जागा मिळाल्याशिवाय राहणार नाहीत.

ज्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली ज्यांनी धनुष्यबाण गहाण ठेवला अशांना कोकणातील जनता धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असे सांगत तुमच्या लाडक्या आमदार योगेशदादाला येत्या निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने आमदार बनवा. मी त्यांना नामदार केल्याशिवाय राहणार नाही, असे उद्गार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दापोली विधानसभेचे उमेदवार योगेश कदम यांच्या प्रचार सभेमध्ये काढले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, दापोलीच्या समृद्ध भूमीत योगेश कदम भगवा झेंडा घेऊन उभा आहे. योगेश कदमने दापोली मतदारसंघांमध्ये रेकॉर्ड ब्रेक निधी आणला आहे. त्यामुळे त्याचा विजय पक्का आहे. त्यामुळे २३ तारखेला विजयी फटाके एवढे वाजवा की, त्यांचा आवाज बांद्राच्या मातोश्रीपर्यंत गेला पाहिजे. आदित्य ठाकरे सांगतात, मी रामदास भाई कदमांना काका म्हणायचो मग त्याच काकांच्या पाठीत खंजीर खुपसून वडील मुख्यमंत्री झाले आणि पोरगा काकांचं पर्यावरण मंत्री पद हिसकावून घेत स्वतः नागोबा सारखा पदावर बसला. त्यामुळे कुणी कुणावर टीका करायची याचं भान आदित्य ठाकरे यांना नसून त्यांचं राजकारण म्हणजे पोरखेळ असल्याचा टोलाही एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांना लगावला. महायुतीच्या सरकारने लाडकी बहिण योजना सुरू केली त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबाला त्याचा फायदा झाला.

मात्र महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या डोळ्यात ही योजना खुपली. योजना बंद पडावी म्हणून ही मंडळी कोर्टात गेली मात्र विजय हा सत्याचा झाला आणि लाडक्या बहिणीच्या खात्यावर पैसे जमा झाले. या लाडक्या बहिण योजनेमुळे महाराष्ट्र डबघाईला जाईल असे म्हणणारे आता महिन्याला ३ हजार रुपये सरकार आल्यास देऊ असे जाहीरनाम्यात सांगतात,अशा ढोंगी लोकांना लाजा कशा वाटत नाही असेही यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले. महाराष्ट्रमध्ये महिलांच्या केसाला धक्का लागला तर आम्ही त्या नराधमाला फाशी दिल्या शिवाय राहणार नसल्याचे वचनही त्यांनी यावेळी महिलांना दिले. या सावत्र व कपटी भावांना आता महिला जोडा दाखवून महाविकास आघाडीला हद्दपार केल्याशिवाय राहणार नसल्याचे ते त्यांनी यावेळी म्हणाले.

कोकणातील जनता साधी भोळी आहे. त्यांनी एकदा का शब्द दिला तो दिला. आज दापोली मतदारसंघातील जनता योगेश कदम यांच्यासोबत आहे. योगेश कदमच्या डोक्यावर बर्फ आहे. तो विरोधकांना लादीवर झोपविण्या आधीच करेक्ट कार्यक्रम केल्याशिवाय राहणार नाही असे सांगत थंडा मतलब कोको कोला कंपनीचा उद्योग योगेश कदम यांच्या पाठपुरामुळे कोकणात येऊ शकला. आम्ही धनुष्यबाण चोरला नाही तर तो धनुष्यबाण तुम्ही गहाण ठेवला होता तो आम्ही सोडवून वंदनिय बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलो. २०१९ ला सुद्धा योगेश कदम हे धनुष्यबाण या चिन्हावर निवडणूक लढले होते आणि आता २०२४ मध्ये सुद्धा या चिन्हावर लढत आहेत हे मतदारांनी लक्षात ठेवले पाहिजे. महायुतीच्या निशाणीवर लढणारा एकही उमेदवार पराभूत होणार नसल्याचा ठाम विश्वास व्यक्त करत योगेश कदम ने दापोली येथील जागृत देवस्थान काळकाई मंदिराचे काम केले आहे. त्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला,त्यामुळे त्या देवीचा आशीर्वाद योगेश कदम यांच्या पाठीशी सदैव राहील असेही ते म्हणाले.

## शृंगारतळी बाजारपेठेत प्रमोद गांधी यांचा वचननामा देत प्रचार



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१६, गुहागर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षप्रमुख राजसाहेब ठाकरे यांची शृंगारतळी येथे प्रचार सभा झाल्यानंतर मनसे पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे.२६४ गुहागर विधानसभा मतदारसंघ मनसेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांच्या प्रचारासाठी मनसे सैनिक जोमाने कामाला लागले आहेत. शनिवारी दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी मनसेचे उमेदवार प्रमोद गांधी, मनसे उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष प्रसाद कुष्टे, आदी पदाधिकारी आणि मनसे कार्यकर्ते गुहागर तालुक्याची आर्थिक राजधानी श्रृंगारतळी बाजारपेठ येथे वचननामा देऊन प्रचार करताना.

## दुर्भा येथील अशोक भेदोडकर यांची धारदार शस्त्राने हत्या



**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१६, झरी (यवतमाळ) :** तालुक्यातील पाटन पासून सात ते आठ किमी अंतरावर असलेले दूर्भा येथील अशोक दयालाल भेदोडकर यांची हत्या केल्याची घटना दि.१४ नोव्हेंबर रोजी ७:३० ते ८ च्या दरम्यान घडली आहे. या घटनेतील मृत व्यक्तीच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून ठार मारल्याची तक्रार पाटन पोलिस ठाण्यात घेण्यात आली आहे. ही घटना दुर्भा रस्त्यावर गोटाळी नाल्याच्या पूलाजवळ घडली आहे. सदर घटनेची फिर्याद मृतकाचे चुलते सुखदेव भेदोडकर यांनी पाटन पोलिस ठाण्यात दिली आहे. मिळालेल्या तक्रारी वरून पाटन पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. या घटनेच्या बाबतीत अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला असून ठाणेदार स्वप्निल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटन पोलिस अधिक तपास करीत घटनेतील गुन्हेगार आरोपीचा शोध घेत आहेत.

## शहापूरात बरोरा विजयाची तुतारी फुंकणार कि दरोडा अचुक वेळ साधणार?



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१६, शहापूर :** शहापूर (१३५) अनुसूचित जमतींसाठी राखीव असलेल्या विधानसभेसाठी चा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे, नेहमीप्रमाणे या वेळी देखील मुख्य लढत पांडुरंग बरोरा आणि दौलत दरोडा या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधेच होणार आहे पण यावेळी दोघांच्या लढतीत तिसऱ्याने चांगलीच चुरस निर्माण केली आहे. १९६७ साली शहापूर विधानसभा मतदारसंघ निर्माण करण्यात आला आणि शहापूर तालुका हा आदिवासी बहुल भाग असल्याने आजवर अनुसूचित जमातींसाठी हा मतदारसंघ राखीव आहे.

१९६७ च्या पहिल्या निवडणुकीत या मतदारसंघातून पी. आर. पाटील हे अपक्ष निवडून आले होते तर त्यानंतर झालेल्या १९७२ च्या निवडणुकीत काँग्रेस तर्फे श्रीरंग शिंगे हे निवडुन आले होते. १९७८ च्या निवडणुकीत कृष्णकांत तेलम हे शेकाप ऊमेदवार निवडुन आले होते. तर सध्या राष्ट्रवादी (शप) पक्षाकडून निवडणूक लढवित असलेले कै. महादु नागो बरोरा हे सलग १९८०, १९८५, १९९० तीन वेळा काँग्रेस कडुन आमदार झाले.

मात्र १९९५ साली झालेल्या निवडणुकीत या मतदारसंघातून शिवसेनेने कंबर कसली आणि एक नवीन युवकाला संधी देत दौलत दरोडा यांना तिकिट देऊन निवडून आणले, परत १९९९ च्या निवडणुकीत दौलत दरोडा हे शिवसेनेचे आमदार बनले. मात्र २००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने पांडुरंग बरोरा(महादु बरोरा यांचे चिरंजीव) यांना शिवसेनेच्या दौलत दरोडा यांच्या विरोधात ऊभे केले आणि पांडुरंग बरोरा पहिल्यांदा आमदार बनले. २००९ मधे पुन्हा या दोघांमध्येच लढत झाली आणि शिवसेनेचे दौलत दरोडा यांनी पांडुरंग बरोरा यांचा पराभव केला. २०१४ च्या निवडणुकीत देखील दोघांमध्येच लढत होऊन पांडुरंग बरोरा हे राष्ट्रवादी काँग्रेस चे ऊमेदवार म्हणून विजयी झाले. २०१९ च्या निवडणुकीपुर्वी मात्र बदलत्या हवेचा अंदाज घेत पांडुरंग बरोरा यांनी शरद पवार यांनी साथ सोडली आणि धनुष्यबाण हाती घेतला, बरोरा शिवसेनेत आल्यामुळे दौलत दरोडा यांना पक्षातच प्रतिस्पर्धी निर्माण झाला, पांडुरंग बरोरा यांनाच शिवसेनेची ऊमेदवारी मिळणार हे नक्की झाल्याने शेवटच्या क्षणी दौलत दरोडा यांनी पक्षांतर केले आणि राष्ट्रवादी काँग्रेस मधे प्रवेश करत ऊमेदवारी मिळवली आणि पुन्हा पक्ष बदलुन या दोघांमध्येच लढत झाली आणि दौलत दरोडा यांनी पांडुरंग बरोरा यांचा पराभव केला. २०१९ साली फडणवीस - अजितदादां यांच्या पहाटेच्या शपथविधी दौलत दरोडा काही दिवस नॉट रिचेबल झाले होते. आता पुन्हा लढत होत आहे ती या दोन पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधेच. खरे तर शहापूर तालुका हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे, ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यामधे शिवसेनेचे कायमच वर्चस्व राहिले आहे, शिवसेनेचा अभेद्य गड म्हणून शहापूर तालुका ओळखला जायचा मात्र या निवडणुकीत ना शिंदे सेनेचा ऊमेदवार आहे ना शिवसेना (ऊबाठा). दोन्ही ऊमेदवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत.

गेल्या तीस वर्षांपासून बरोरा, दरोडा या दोघांकडे आमदारकी राहिली आहे मात्र शहापूर शहर वा तालुका आजही विकासाच्या प्रतिक्षेत आहे. शहापुर तालुका धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो, तानसा, भातसा, वैतरणा ही मोठी धरणे ही शहापूर तालुक्याची ओळख आहे मात्र तालुक्यात किमान पिण्याच्या पाण्यासाठी जनतेला वणवण भटकावे लागत आहे ही परिस्थिती आहे. अनेकदा आंदोलने झाली, हंडे मोर्चे काढले गेले मात्र दोन्ही आमदारांच्या कार्यकाळात परिस्थिती जैसे थे च आहे. मुंबई ला जवळ असलेल्या या तालुक्यात गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून मोठ्याप्रमाणावर नागरीकरण, शहरीकरण झाले, मात्र त्या प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात ना प्रशासन गंभीर ना लोकप्रतिनिधी. रस्ता तिथे खड्डे ही तालुक्यातील परिस्थिती आहे. खोपोली - शहापूर मार्ग चौपदरीकरण गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. आरोग्य सुविधांबाबत तर बोलायलाच नको अशी परिस्थिती आहे, पंधरा वीस वर्षांपूर्वी तालुक्याचे ठिकाण शहापूर येथे १०० खाटांचे रुग्णालय ऊभारले गेले, त्याला ऊप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिला गेला मात्र अपुरे मनुष्यबळ, अद्ययावत यंत्रणा, मशीनरी, औषधांची ऊपलब्धता याची मात्र वानवा आहे.

शहापुर बस पोर्ट चे काम गेल्या कित्येक वर्षांपासून रखडले आहेत ते कधी पुर्ण होणार हे कोणीच सांगु शकत नाही. आसनगाव रेल्वे स्थानकातुन लाखो प्रवासी महिला, विद्यार्थी, नोकरदार प्रवास करीत असतात, त्यांच्या अनेक समस्या आहेत मात्र त्याकडे ना रेल्वे प्रशासन ना स्थानिक लोकप्रतिनिधीं लक्ष देतात, निवडणुकांच्या काळात मात्र हेच लोकप्रतिनिधी रेल्वे स्थानकावर हात जोडून मते मागतांना दिसतात. निवडणूकीच्या काळात आश्वासने सगळेच देतात मात्र जनतेचे प्रश्न आहे तसेच रहातात हेच शहापूर बाबत देखील होत आहे.महागाई, भ्रष्टाचार बेरोजगारी या प्रश्नावर कोणाकडेच ऊत्तर नाही, कंत्राटदारी, टक्केवारी, कमिशन, आपापल्या बगलबच्यांचे हित जोपासणे हे ईतरत्र दिसणारे चित्र या मतदारसंघात देखील दिसते,त्यामूळे सत्ताधारी मस्त, विरोधक सुस्त आणि जनता त्रस्त असे तालुक्यातील चित्र आहे.

## राणी लंके यांना टाकळी ढोकेश्वर गटातून मोठे मताधिक्य देणार - प्रकाश गाजरे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर):** लोकसभा निवडणुकीमध्ये खासदार नीलेश लंके यांचे जीवाभावाचे सहकारी लोकसभा मतदासंघातील विविध तालुक्यांमध्ये महिनाभरापासून ठाण मांडून होते. त्यामुळे गावागावांमध्ये त्यांचे दुर्लक्ष झाले. आता मात्र लंके यांचे शिलेदार आपल्या गावाची तटबंदी राखण्यासाठी सज्ज आहे. राणी लंके या मतदासंघातील जिल्हा परिषदेच्या सर्व गटांमध्ये मोठे मताधिक्य घेऊन विक्रमी मतांनी विजयी होतील., म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांनी केले. काशिनाथ दाते यांचे होमग्राऊंड असलेल्या पोखरीचे सरपंच सतीश पवार, वारणवाडीचे सरपंच संजय काशिद यांनी खासदार.नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये पोखरीमध्येच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्या वेळी ते बोलत होते. म्हसोबा झापचा सरपंच मीच आहे.

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या बालेकिल्ल्यालाच खिंडार पडल्याचे म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांनी सांगितले. गाजरे म्हणाले, ज्या टाकळी ढोकेश्वर गटाचे दाते हे नेतृत्व करत आहेत. त्या गटामध्ये आज काय राजकीय परिस्थिती आहे ? गटातील एकूण २२ ग्रामपंचायतीपैकी १७ ग्रामपंचायतीचे सरपंच पोखरीमध्ये पार पडलेल्या टाकळी ढोकेश्वर गटाच्या प्रचार सभेस उपस्थित होते. प्रचारसभेची गत पाहिली तरी टाकळी ढोकेश्वर आता कोणाचा बालेकिल्ला आहे याची प्रचिती येते. अलिकडेच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत खासदार नीलेश लंके यांनाच आघाडी होती. पाच वर्षापूर्वीच्या विधानसभेलाही नीलेश लंके यांचाच वरचष्मा होता. आता यावेळच्या विधानसभा निवडणुकीतही राणी लंके यांचे मताधिक्य नीलेश लंके यांच्या मागील दोन निवडणुकांपेक्षाही अधिक असणार असल्याचा दावा सरपंच गाजरे यांनी केला.

## प्रवरेच्या नादी लागून तालुक्यात महाविकास आघाडीला दृष्ट लावण्याचे पाप : बाळासाहेब हराळ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, (अहिल्यानगर) :** महाराष्ट्रात सर्वात प्रथम २००७ मध्ये नगर तालुक्यात महाआघाडीचा प्रयोग झाला. तब्बल १५ वर्ष लोणीकरांसह भल्या भल्यांना पाणी पाजणाऱ्या या महाआघाडीला प्रवरेच्या नादाला लागून दृष्ट लावण्याचे पाप आमच्या एका मित्राने केले आहे. पण आता तुम्ही त्याच्या नादी लागून भावनिक होऊ नका, नगर तालुक्याची लेक असलेल्या राणी लंके यांनाच या निवडणुकीत मतदान करून आमदारकीची ओवाळणी द्या असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य आणि नगर तालुका महाआघाडीचे नेते बाळासाहेब हराळ यांनी केले. पारनेर - नगर विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी निलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे शुक्रवारी (दि.१५) रात्री जाहीर सभा झाली. या सभेत बाळासाहेब हराळ यांच्या सह जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांनी अपक्ष उमेदवार संदेश कार्ले यांच्यावर टीकास्त्र सोडले. हराळ म्हणाले नगर तालुका महाआघाडीला प्रवरेची नजर लागली आहे. आमच्या मित्राला सर्वांनी सांगितले. टेंडर भरू नको, आम्ही या पूर्वी भरलेले टेंडर फेल गेलेले आहे. फक्त लावालावी करून द्यायची आणि गंमत बघायची ही लोणीकरांची सवय आहे. त्यांचे टेंडर भरून पापाचे वाटेकरी होऊ नका, पण त्यांनी नाही ऐकले. आता तुम्हीही त्यांचे ऐकू नका भावनिक होऊ नका. राणी लंके यांच्या रूपाने नगर तालुक्याची लेक आमदार होणार आहे. यावेळी माजी पंचायत समिती सभापती नंदा शेंडगे, योगीराज गाडे, राधाकृष्ण वाळुंज, अंकुश शेळके, महेश कडूस, स्वाती धामणे, सुवर्णा धाडगे यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय



### धारावीविषयी नवा दृष्टिकोन हवा!

धारावी पुनर्विकास प्रकल्प बांधकाम व्यवसायाचा अनुभव नसणाऱ्या आणि मुंबईबाहेरील अदानी उद्योग समूहाला देण्यात यावा की नाही, यावर सध्या बरीच मतमतांतरे दिसतात. या प्रकल्पामुळे अदानी उद्योग समूहाला प्रकल्पाची ५४० एकर जमीन, मुंबईमधील विविध ठिकाणच्या ५०० एकर जमिनी, विकास करात सूट आणि हस्तांतर होणाऱ्या चटई क्षेत्रात वाटा मिळाला आहे. पुनर्विकासाचे अनेक उत्तम पर्याय उपलब्ध असताना ते डावलून मुंबईच्या होऊ घातलेल्या या लुटमारीला जाणत्या मुंबईकरांचा पाठिंबा नाही. पण केवळ हा प्रकल्प अदानी समूहाकडून काढून घेणे मुंबईकरांच्या भविष्याच्या दृष्टीने का पुरेसे नाही हेही पाहायला हवे

सुमारे ३० वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी झोपडपट्टीमुक्त मुंबईचे स्वप्न पाहिले. अर्थव्यवस्था, शहरांबद्दलचे अपुरे ज्ञान आणि प्रशासकीय अनुभवाचा अभाव यामुळे ते स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही. याच चुकांच्या पायावर शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील युती सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानींना सोपविला. मुंबईकरांनी यामागचे राजकारण आणि अर्थकारण समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी काही वर्षे मागे जाऊन परिस्थिती समजून घ्यावी लागेल.

मुंबई स्वतंत्र महाराष्ट्राची राजधानी झाल्यापासून येथील अर्थव्यवस्था झपाट्याने वाढू लागली. सत्तरच्या दशकात मराठवाड्यात महाप्रचंड दुष्काळ पडला. या दोन कारणांमुळे स्थलांतरितांचे लोंढे मुंबईभर पसरू लागले. तेव्हा स्थलांतरितांना विरोध हा राजकीय मंत्र असल्याने त्यांना वाढत्या शहरात सामावून घेण्याचा विचार झाला नाही. धोरणाच्या अभावाचा गैरफायदा घेत जमीन माफियांनी झोपडवस्त्या वसवून स्थलांतरितांना आश्रय दिला. कायदा आणि शासकीय बळाचा वापर होऊनही अशा वस्त्यांत वाढ होतच राहिली. मोक्याच्या जागी, खाडी आणि दलदलीच्या जमिनींवर धारावी कोळीवाड्यालगत असलेल्या जमिनीवर अनधिकृत उद्योग आणि वस्ती प्रस्थापित झाली ती याच काळात.

अशा राजकीय-प्रशासकीय हतबलतेच्या काळात नाईलाजाने झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा विचार सुरू झाला. १९८५ साली राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने धारावी झोपडवस्ती पुनर्विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला. रहिवाशांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. म्हाडाने जमीन विनामोबदला दिली. मालकी हक्काच्या घरासाठी रहिवाशांनी बांधकाम खर्चात वाटा उचलला. रहिवाशांचा सामूहिक आर्थिक सहभाग आणि म्हाडाच्या आर्थिक, तांत्रिक प्रशासकीय मदतीतून दहा वर्षांत ३८०० घरे बांधली गेली. लोकांच्या गरजा आणि ऐपत या दोन्ही निकषांचा विचार करून याच धर्तीवर इतर झोपडपट्ट्यांसाठी शासनाने 'स्लम रिडेव्हलपमेंट स्कीम' तयार केली. ही सर्व प्रक्रिया आशादायक असली तरी संथ होती. परंतु त्याला अचानक खीळ बसली.

दहा वर्षांत- १९९५ मध्ये मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे आश्वासन देत महाराष्ट्रात शिवसेनेने सत्ता मिळवली. बाळासाहेब ठाकरे यांचे हे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी सरकारने धोरण आखले. प्रत्येक पात्र झोपडी धारकाला २५० चौ. फुटांचे मालकी हक्काचे घर विनामोबदला देण्याचे आश्वासन दिले गेले. खासगी विकासकांना वाढीव चटई क्षेत्राच्या बांधकामातून रास्त नफा मिळेल आणि त्यातून ते झोपडीवासीयांसाठी घरे बांधतील असा साधा-सोपा हिशेब त्यामागे होता. शासनाला आणि झोपडीवासीयांना पैसे खर्च करावे लागणार नव्हते आणि तरीही झपाट्याने मुंबई झोपडपट्टीमुक्त होईल अशी अपेक्षा तेव्हा होती. सर्वांना लाभ देणारी ही योजना आकर्षक वाटली नसती तरच नवल. त्यामुळे तेव्हा त्याला पुरेसा राजकीय विरोध झाला नाही.

# सुजाण नागरिकाने मतदान करायलाच हवे !



लोकांनी लोकांचा हितासाठी लोकांमार्फत चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य. दर पाच वर्षांनी होणारी निवडणूक हा लोकशाहीचा पाया आहे. आपल्या परिसराचा, राज्याचा आणि देशाचा विकास साधणारा नेता निवडून देण्याची संधी यानिमित्ताने देशातील सुजाण नागरिकांना मिळते त्यामुळे ही निवड करताना ती कोणत्याही प्रलोभनांना, दबावाला अथवा भावनांना बळी पडणारी नसावी याची दक्षता घेणे नागरिकांचे अलिखित कर्तव्य आहे. तसे कुठे होत असेल तर त्याबाबत रीतसर तक्रार करण्याचा अधिकारही नागरिकांना देण्यात आलेला आहे.

राज्यातील विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर आल्याने आज सर्वत्र त्याचाच माहोल आहे. आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ देशभरातील नेतेमंडळी राज्यात दाखल झाली आहेत. हजारोंच्या सभा होत आहेत, आश्वासनांचा पाऊस पाडला जात आहे, त्यासोबत विरोधी उमेदवार किती नाकाम आहे किंवा विरोधी पक्ष किती भ्रष्ट आणि राज्याची धुरा सांभाळण्यास अपात्र आहे हे सांगताना नेतेमंडळीं जराही मागेपुढे पाहताना दिसत नाहीत. समस्त राजकीय पक्षांनी आपले जाहीरनामे प्रसिद्ध केले आहेत, ते वाचल्यावर यांना सत्तेत बसवल्यावर महाराष्ट्रात जणू रामराज्यच अवतरणार आहे असा भास होऊ लागतो, अर्थात सर्वच पक्षांचे जाहीरनामे साधारण तशाच स्वरूपाचे आहेत. यामध्ये लाडक्या बहिणींना, भावांना, तरुणांना, जेष्ठ नागरिकांना हजारो रुपये वाटण्याचे आश्वासन तर दिले आहे, मात्र हा पैसा कसा उभा करणार याचे नियोजन काही दिलेले नाही किंवा याच्यामुळे महागाई वाढणार नाही याचे वचनही दिलेले नाही. जे नागरिक मागील ३०-४० वर्षांपासून मतदान करत आहेत, त्यांना हे जाहीरनामे किती फसवे असतात याची चांगलीच जाण आहे. समस्त प्रसारमाध्यमे, प्रसिद्धी माध्यमे, वर्तमानपत्र, इंटरनेट, होर्डींस, सूचना फलक, घरांच्या भिंती यांवर पक्षांच्या आणि उमेदवारांच्याच जाहिराती दिसून येत आहेत. उमेदवारांचा प्रचार करणाऱ्या मंडळींच्या खाण्या पिण्यावर लाखो रुपये खर्च केले जात आहेत. प्रचारात एकमेकांच्या समोर आल्यावर यांच्यामध्ये हाणामारी होऊन एकमेकांची डोकीही फोडली जाऊ लागली आहेत. विरोधी पक्षाचा उमेदवार प्रचार करताना कसा आचारसंहितेचा भंग करत आहे याकडे कटाक्षाने लक्ष देणारी खास मंडळीही प्रत्येक पक्षाने नेमली आहेत, जी संधी मिळताच पोलीस ठाण्यांत तक्रारी दाखल करत आहेत. निवडणुकीच्या १-२ दिवस आधी काही ठिकाणी नागरिकांना पैशांचे, भेटवस्तूंचे वाटपही करण्यात येईल. याकडे विरोधी पक्षासह पोलिसांचेही विशेष लक्ष असेल. निवडणुकीच्या दिवशी मतदारांची नावे मतदार यादीतून गायब असणे, मतदान संथगतीने होणे, ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड होणे, मतदान कक्षावरील विद्युत पुरवठा खंडित होणे, पक्षाचे कार्यकर्ते आणि पोलिसांत बाचाबाची होणे यांसारख्या घटना नेहमीप्रमाणे यावेळीसुद्धा पाहायला मिळतील; त्यावर निवडणूक आयोगाने आणि पोलिसांनी काय सिद्धता केली आहे हेही यानिमित्ताने पाहायला मिळेल.

विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा निवडणूक आयोगाने यंदा दिली आहे आणि हा खर्च आयोगाला सादर करणेही बंधनकारक असले, तरी यंदाच्या निवडणुकांत उमेदवारांकडून आणि पक्षांकडून केला गेलेला हायटेक प्रचार, राज्याच्या प्रमुख मार्गांवर लावण्यात आलेल्या मोठमोठ्या डिजिटल होर्डिंग्स, राज्यातील प्रत्येक वर्तमानपत्रांतून दिसणाऱ्या मोठमोठ्या जाहिराती, उमेदवारांसोबत फिरणारा शेकडो कार्यकर्त्यांचा लवाजमा, उमेदवारांनी प्रचारार्थ तयार केलेली विशेष वाहने हे पाहिल्यावर हे सर्व ४० लाखांत कसे बरे मॅनेज केले असेल हा प्रश्न पडतो. देशाच्या पंतप्रधानांपासून मंत्रिमंडळातील प्रमुख मंडळी राज्यात तळ ठोकून आहेत, मग त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या खात्याचा कार्यभार कोण बरे सांभाळत असेल ? त्यांच्या प्रवासावर आणि सुरक्षेवर होणारा खर्च सामान्य करदात्यांच्या सरकारी धनातून होतो की पक्षाच्या निधीतून ? प्रचारासाठी लाखो रुपये खर्च करणाऱ्या उमेदवारांची धडपड ही केवळ निवडून येऊन जनतेची सेवा करण्यासाठी असते का ? आजमितीला प्रचार करणाऱ्या सर्वच प्रमुख पक्षांना सत्तेची चव चाखण्याची संधी राज्याच्या जनतेने दिली आहे, तरीही राज्यातील समस्या अद्याप सुटलेल्या का नाहीत ? राजकीय पक्षांना असलेली सत्तेची लालसा आणि केले जाणारे सुडाचे राजकारण यांमुळे कोणी जरी सत्तेवर आले तरी आपली स्थिती काही बदलणार नाही याचा विचार करून आज अनेक जण निवडणुकांपासून दूर राहणे पसंत करतात, ज्याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होतो. प्रत्येक निवडणुकीसाठी सरकारी तिजोरीतील हजारो कोटी रुपये खर्च केले जातात; मात्र नागरिकांच्या निरुत्साहामुळे निवडणुकीचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य होत नाही. मी मतदान नाही केले म्हणून निवडणूक थांबणार नाही, मात्र माझ्या मतदान न करण्यामुळे एखादा गुंड प्रवृत्तीचा उमेदवार निवडून आला तर त्याच्यामुळे होणाऱ्या समाजाच्या हानीस मी जबाबदार असणार आहे हे मतदान न करणाऱ्या प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे. आजच्या घडीला धुतल्या तांदळाचा उमेदवार मिळणे दुरापास्त असले, तरी त्यातल्या त्यात जनतेची सेवा करू शकणारा, लोकभावनेचा विचार करणारा, आपल्या क्षेत्रातील समस्या सोडवू शकण्याची क्षमता असणारा, आपल्या समस्यांना विधिमंडळाच्या सभागृहात वाचा भोडणारा उमेदवार आपण निवडायला हवा मग तो कोणत्याही पक्षाचा असो वा अपक्ष. हा देश, हे राज्य माझे आहे असे जेव्हा आपण अभिमानाने म्हणतो तेव्हा या राज्याची, देशाची धुरा सक्षम हातात देण्याचे दायित्वही माझेच आहे याची जण प्रत्येकाने ठेवायला हवी. त्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने मतदान करणे अपरिहार्य आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघात मनसेला शिवसेना (उबाठा) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पंढरपूर शहर पदाधिकारी आणि राष्ट्रीय रिपब्लिकन सेनेचा जाहीर पाठिंबा मनसेचे माजी आमदार जयप्रकाश बाविस्कर यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

यावेळी माजी आमदार जयप्रकाश बाविस्कर यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की दिलीप धोत्रे हे सर्वसामान्य माणसांसाठी धावून जाणारे नेते आहेत. यामुळे त्यांना सर्व क्षेत्रातील आणि समाजातील नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे. त्यांनी राज ठाकरे यांचे विचार घराघरात पोहोचवण्याचे काम केले आहे. यामुळे त्यांचा विजय निश्चित असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाली की या



मतदार संघात कोणताही विकास झाला नाही. युवक बेरोजगार झाला आहे. महिलांसाठी रोजगार निर्मिती नाही. मात्र निवडणुकीत उभारणाऱ्या उमेदवारांना याचं काहीही देणं घेणं नाही. ही निवडणूक गरीब विरुद्ध श्रीमंत अशी असल्याने माझा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की पंढरपुरात महाविकास आघाडीत मैत्रीपूर्ण लढत होत आहे. मात्र आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी सर्वसामान्य जनतेसाठी केलेल्या कामामुळे प्रभावित होऊन स्थानिक उमेदवार म्हणूनच जाहीर पाठिंबा देण्यात आला असल्याचे सांगितले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर समन्वयक लंकेश काकासाहेब बुरांडे, शहर संघटक सचिन बनपट्टे, उपशहर प्रमुख विनायक वणारे, उपशहर प्रमुख तानाजी मोरे, उपशहर प्रमुख ईश्वर साळुंखे, युवासेना उपतालुका प्रमुख प्रणित पवार, शाखाप्रमुख निखिल पवार, शाखाप्रमुख पिंटू रेड्डी, विभाग प्रमुख पंकज डांगे, विभाग प्रमुख गणेश जाधव, शाखाप्रमुख विजय जाधव, भरत साळुंखे, ऋषिकेश वनारे, भाजपा शहर उपाध्यक्ष दीपक बंदपट्टे, भारतीय लोकशक्ती पक्ष शहराध्यक्ष शहराध्यक्ष गणेश जाधव, राष्ट्रीय रिपब्लिकन सेनेच्या आदी पदाधिकाऱ्यांनी मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांना जाहीर पाठिंबा दिला.

### ठाकरे जी..

बाळासाहेब ठाकरे
व्यक्तित्व अलौकिक
मराठी मातीस लाभे
अनमोल हे माणिक

मराठी माणसा प्रती
असे विशेषजवळीक
बाँम्बेची केली मुंबई
सुस्वभावीआगळीक

व्यंगचित्रा वाहिलेले
साप्ताहिक मार्मिक
वर्मावरती शरसंधान
प्रयोग हो अलौकिक

सामनापक्ष मुखपत्र
लढवैये सार्थ दैनिक
रक्षण करे समाजाचे
शब्दशस्त्रांचे सैनिक

कर्तृत्वाअन् वक्तृत्वा
छान जमे सोयरिक
स्वप्नआणावे सत्यात
सुखी राहो नागरिक

हिंदू हृदय सम्राट हा
जग जाणे लौकिक
अयोध्या मंदीर झाले
तुष्ट कारसेवा श्रमिक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

## डहाणू विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार विनोद मेढा यांचा घरोघरी प्रचार...

**अक्षराज : हरी कापसे**

**दि.१६, तलासरी :** तलासरी-भाजपा- महायुतीचे अधिकृत उमेदवार विनोदजी मेढा यांनी डहाणू-तलासरी ग्रामीण खेडोपाडी भागात जाऊन प्रचार सभा घेत आहेत. अश्या सभेला उत्साहपूर्ण उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे.

अनेकांच्या व गोर-गरिबांच्या समस्या एकून घेत डायरीत नोंद करीत आहेत.डहाणू विधानसभेतकमळच फुलणार असा विश्वास सर्वत्र मतदार मधून व्यक्त होत आहे. जसजशी मतदान करण्याची तारीख जवळ येत आहे तसा विनोद मेढा यांचा वाढत चालला आहे. अनेकांनी स्वतःहून पाठिंबा जाहीर केला आहे. डहाणू ग्रामिण भागात शिवाजी महाले यांनी व पदाधिकारी कार्यकर्ते अनेकांशी मतदारांशी भेटी व संपर्क साधत प्रचार



करीत आहेत.

तर जिल्हाध्यक्ष भरतजी राजपूत यांनी व त्यभागाचे कार्यकर्ते यांनी मिळून डहाणू गाव व शहरी भागात घरोघरी लहान-मोठया मतदारांशी सभा आणि भेटी-गाठी करीत शहर-ग्रामिण भाग पिंजून काढला आहे. अनेक मतदारांकडून कमळ निशाणीवर मतदान करण्यासाठी उदंड उत्साहपूर्ण उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे.

डहाणू विधानसभा मतदारसंघात एकूण आठ(८) उमेदवार विनोद मेढा भाजपा-महायुती, विजय वाढीया-मनसे,विनोद निकोले-कम्युनिष्ठ पार्टी, संतोष ठाकरे- बहुजन समाज पार्टी, सुरेश पाडवी-बहुजन विकास आघाडी, कल्पेश भावर-अपक्ष, वसंत भसरा-अपक्ष, मीना भड अपक्ष इत्यादी उमेदवार रिंगणात उभे आहेत.

या आठ पैकी भाजपा-महायुतीचे उमेदवार विनोदजी मेढा आणि कम्युनिष्ठ पक्षाचे उमेदवार विनोदजी निकोले या दोघांमध्ये अती चुरशीची लढत दिसत आहे. परंतू प्रचंड संघर्ष करीत सामाजिक धार्मिक कामात समाजात नेहमी पुढे असणारे स्वतःचे अस्तित्व निर्माण करणारे अती लोकप्रियत्ये मुळे जनतेमध्ये विनोद मेढा यांना निवडून देण्याचे आशीर्वाद मिळत आहे.

## खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी केली उमेदवारांच्या खर्चाची तृतीय तपासणी

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१६, हदगांव (नांदेड) :** हदगाव विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तृतिय तपासणी आज खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी केली.याप्रसंगी काही उमेदवार तर काही उमेदवारांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

गुजरात क्डॅरचे चे २००९ बॅचचे आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी मयंक पांडे हे सुरत येथे आयकर विभागात अतिरिक्त आयुक्त आहेत त्यांच्याकडे भारत निवडणूक आयोगाने नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव, भोकर, नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण या विधानसभा क्षेत्राचे



खर्च निरीक्षक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. मयंक पांडे (आयआरएस) यांचा संपर्क मोबाईल क्रमांक ०८४८३८४५२२० आहे. तर त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा परिषदचे नांदेड चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना मो.नं ९०११०००९२१ हे आहेत.

खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी आज उमेदवारांच्या खर्चाची प्रथम तपासणी करून काही मार्गदर्शक सूचना दिल्या खर्च विभागाचे काम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा हदगावच्या तहसिलदार श्रीमती सुरेखा नांदे, सहायक खर्च निरीक्षक गणेश पुजारी, खर्च विभागाचे पथक प्रमुख सचिन कद्रे आदी उपस्थित असल्याचे मिडिया कक्षातील ए.एम. तामसकर, अनिल दस्तूरकर यांनी कळविले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## १८ व १९ नोव्हेंबर ला शाळांना सुट्ट्या नाहीत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, ठाणे :** बुधवार, दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे. सोमवार, दिनांक १८ व मंगळवार, दिनांक १९ रोजी सुट्टी जाहीर करण्याबाबत काही संभ्रम निर्माण झाल्याचे दिसते. शासनाच्या पत्रान्वये दिलेल्या सूचना अत्यंत स्पष्ट आहेत. याबाबतीत असे कळविण्यात येते की, सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४ व मंगळवार, दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी शाळा सुरु राहतील. तसेच उक्त दिवशी कोणतीही सार्वत्रिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही. असे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी कळविले आहे. केवळ ज्या शाळेतील सर्व शिक्षकांची नियुक्ती निवडणूक कामासाठी झाल्यामुळे एकही शिक्षक शाळेत उपलब्ध असणार नाही अशा शाळांबाबत स्थानिक स्तरावर मुख्याध्यापक यांनी त्यांचे अधिकारात सुट्टी जाहीर करावी व अशा शाळा वगळता उर्वरित सर्व शाळा नियमितपणे सुरु राहतील. केवळ उपरोक्त परिस्थितीतील विशिष्ट शाळांना स्थानिक पातळीवर मुख्याध्यापक यांनी सुट्टी जाहीर करावी. तसेच ही सरसकट व सार्वजनिक सुट्टी नाही याची नोंद घ्यावी. तसेच कोणत्याही शाळा अनावश्यकरित्या बंद राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

## पारनेर-नगर मतदारसंघात मनसेचा आक्रमक उमेदवार

**अक्षराज : राजकुमार इकडे**



**दि.१६, सुपा (अहिल्यानगर) :** विधानसभेच्या रणधुमाळी मधे पारनेर नगर मतदारसंघात हिंदुत्ववादी विचार जीवंत ठेवण्यासाठी,राजसाहेब ठाकरेच्या विचाराने प्रेरीत होउन पारनेर नगर विधान सभा मतदार संघात तरूण पिढीने कंबर कसली असुन खर्या लोकशाही मार्गाने जाण्यासाठी आजचा समाज हा पुढारी, नेत्यामागे न जाता हिदुत्व विचारांची पकड मजबुत होण्यासाठी मनसेचा अधिकृत उमेदवार म्हणुन सर्व सामान्य कुटुंबातील शेतकरी अविनाश पवार यांनी कंबर कसली असुन निवडनुकिच्या रिंगनात उतरले आहेत.

पारनेर तालुका हा तसा डाव्या विचारसरनीचा तालुका मानला जातो. पारनेर तालुक्यात घरानेशाहीला मतदार कधीही थारा देत नाही. आजचा मतदार हा हुशार असुन उमेदवार कोण आहे, तो करणार असलेले विकास कामे, सुपा औद्योगिक वसाहतीत भुमिहीनांना काम, शेतीमाला हमी भाव, तरुण वर्गाला काम मिळावे. हिदूत्ववादी विचार हे लोकशाही मार्गाने टिकावे. म्हणुन मी पारनेर नगर विधान सभेची निवडनुक लढवित आहे. असे पारनेर तालुक्यातील सुपा येथील मनसेचे उमेदवार अविनाष पवार यांनी सांगितले.

## दिव्यांग आणि ८५+ वयाच्या मतदारांकरिता गृहभेट मतदान सुविधा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, बेलापूर (नवी मुंबई) :** निवडणूक आयोगाच्या निर्देशानूसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करीता १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघात ८५+ वय असलेले व ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले मतदार यांचे साठी गृहभेट मतदान सुविधा पुरविण्यात आली. त्या अनुषंगाने एकूण - ४ पथके नेमली होती. सदर गृहभेट मतदान प्रक्रिया दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी गृहभेट पथकाद्वारे व्हिडीओग्राफी सह पूर्ण करण्यात आली. दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रथम गृहभेट देण्यात आली. सदर भेटीच्या दरम्यान ८५+ वय असलेले ३६ मतदारांपैकी ३४ मतदारांचे गृह मतदान पुर्ण झाले तसेच ४० टक्क्या पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले असलेल्या ९ मतदारांपैकी ८ मतदारांचे मतदान पुर्ण झाले.

८५+ वय असलेले असलेल्या २ अनुपस्थित मतदारांपैकी १ मतदाराचे निधन झाल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. तसा पंचनामा व मृत्यूबाबतचा वैद्यकीय दाखला घेण्यात आला आहे. तसेच १ मतदार प्रकृती ठीक नसल्यामुळे रुग्णालयात दाखल असल्यांचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. तसेच ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या १ अनुपस्थित मतदाराची प्रकृती ठिक नसल्यामुळे रुग्णालयात दाखल असल्यांचे त्यांच्या निकट वर्तीयांनी सांगितले. त्यामुळे सदर २ अनुपस्थित मतदारांचे गृह मतदान प्रक्रिया दि.१७ नोव्हेंबर २०२४ रोजी द्वितीय भेटीत करण्यात येईल.

# गांजा तस्करीचा मोठा कट उधळला; ठाणे गुन्हे शाखेची कारवाई

## २४ किलो गांजा जप्त !

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**



**दि.१६, कल्याण (ठाणे) :** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत कल्याण परिसरातून २४ किलो ९६२ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त केलेल्या गांजाची किंमत अंदाजे ५,२०,०००/- रुपये आहे. गुन्हे शाखा, घटक-३, कल्याण येथील पोलीस शिपाई मिथुन राठोड यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, काही इसम विठलवाडी स्टेशन परिसरात गांजाची विक्री करण्यासाठी येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने विठलवाडी स्टेशनबाहेर पाळत ठेवून सापळा रचला. काही वेळाने ३ इसम २ प्रवासी बॅगा घेऊन रिक्षामधून उतरल्याचे पोलिसांना दिसले. संशयितांना थांबवून त्यांच्याकडे असलेल्या बॅगांची झडती घेतली असता, बॅगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गांजा सापडला. ताब्यात घेतलेल्या तिघांची ओळख पुढीलप्रमाणे आहे: -

१.गणेश विवेक जमखंडी (२६ वर्षे), रा. विनायक कॉलनी, कल्याण पूर्व

२.अमीर सलीम शेख (२८ वर्षे), रा. जय अंबे कॉलनी, कल्याण पूर्व


३.राज रवि पटेल (२६ वर्षे), रा. लक्ष्मी पुनम अपार्टमेंट, कल्याण पूर्व

तपासादरम्यान, आरोपींनी सांगितले की त्यांनी हा गांजा ओडिशा राज्यातून विकत घेतला होता आणि कल्याण व उल्हासनगर परिसरात विक्रीसाठी आणला होता.कोळशेवाडी पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब), व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या यशस्वी कारवाईचे नेतृत्व पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, उप आयुक्त शिवराज पाटील आणि सहा.पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या सूचनांनुसार गुन्हे शाखा घटक-३ च्या पथकाने कामगिरी बजावली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, पो.उपनिरीक्षक विनोद पाटील, सहा. पो.निरीक्षक संतोष उगलमुगले आणि पोलीस अंमलदार अशोक पवार, विलास कडू, सुधीर कदम, मिथुन राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या या वेगवान आणि प्रभावी कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. गांजाची मोठी तस्करी रोखून पोलिसांनी समाजावर येणारे संभाव्य अपाय टाळले आहे.

# उपमुख्यमंत्री पवारांच्या पारनेरमधील सभेकडे मतदारसंघाचे लागले लक्ष

## आज काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** आज महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार पारनेर तालुक्यातील भाळवणी येथे घेत असलेल्या सभेकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले असून ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांच्या राजकीय घोडदौडीला पक्षांतर करून अपशकून घडवून आणलेल्या लंके यांना रोखण्यासाठी ते नेमकी कुठली तोफ डागतात याबाबत पारनेर-नगर मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्राला उत्सुकता लागलेली आहे. अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात आज सकाळी ९:३० वाजता बाजारतळ, भाळवणी ता.पारनेर येथे आयोजन करण्यात आलेल्या प्रचार सभेसाठी महाराष्ट्र राज्याचे महसूल तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांसह तालुक्यातील महायुतीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणातील राजकीय घडामोडींनंतर उमेदवारी निश्चित झालेल्या दाते यांना पक्षातील व सर्व समविचारी पक्षातील सहकाऱ्यांनी सहकार्य केल्याने वेळ कमी असूनही त्यांनी प्रचारात चांगल्या प्रकारे आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने एकूण १२ उमेदवार जरी रिंगणात असले तरी सुरवातीच्या काळात खरी लढत ही महाविकास आघाडी व महायुती म्हणजेच लंके व दाते अशीच होईल असे वाटत होते.

परंतु माजी आमदार विजयराव औटी, जि.प.सदस्य संदेश कार्ले व नगराध्यक्ष विजय औटी यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे या मतदार संघातील निकालाची नेमकी काय परिस्थिती राहील हे सांगणे अवघड झालेले असतानाच लंकेनी राजकीय विरोध पुकारलेले अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, शिवाजी कर्डिले व डॉ.सुजय विखे पाटील यांच्यासारखे दिग्गज या मतदारसंघात येणार असल्याने या होणाऱ्या सभेकडे संपूर्ण मतदार संघाचे लक्ष लागले आहे.

# शिर्डीतील सभेतून प्रियांका गांधींचा नरेंद्र मोदींवर हल्लाबोल

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१६, शिर्डी (अहिल्यानगर) :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांना सभांचा धडाका लावला आहे. त्यांच्या प्रचारसभांमधून आरोपांना प्रत्युत्तर दिलं जात आहे. या दरम्यान, प्रियंका गांधी यांनीही विधानसभा निवडणुकीकडे लक्ष केंद्रीत केलं आहे. शिर्डीतील सभेतून प्रियंका गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला आहे. 'जय भवानी', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'साईबाबाजी की जय' अशी घोषणा देत प्रियंका गांधी यांनी भाषणाला सुरुवात केली.

त्या म्हणाल्या, आज येथे सभा होत आहे, त्या मैदानाजवळ साईबाबा बसत होते. आज पहिल्यांदा मला साईबाबांच्या मंदिरात जाण्याचे सौभाग्य मिळाले. आणि खरोखरच ही पवित्र भूमी असल्याची अनुभूती झाली. महाराष्ट्र सामाजिक क्रांतीची धरती आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांची ही धरती असून येथे कणाकणात सत्य, समानता, मानवता आहे.

महाराष्ट्राच्या धरतीने नेहमीच देशाला दिशा दिली. महाराष्ट्रातून स्वातंत्र्याची लढाई मजबूत झाली. इथल्या मातीतील संतांनी मानवतेचा संदेश आणि सत्याची शिकवण दिली. मात्र मोदीजींच्या राज्यात सत्याची बाजू कुठे राहिली आहे? असा सवाल करत त्यांच्या सरकारमधील मंत्री आणि आमदार काहीही बोलायला लागले असून ते महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचा अपमान करत आहेत.

संसदेबाहेरील शिवाजी महाराजांची प्रतिमा हटवली, सिंधुदुर्गातील पुतळा पडला, असं म्हणत त्यांनी मोदींवर हल्लाबोल केला. तर यावेळी त्या म्हणाल्या, मी मोदींना आव्हान देते की, 'त्यांनी एकदा जातीय जनगणना करणार असल्याचं जाहीर करावं.' तर राहुल गांधींना मोदी घाबरू लागले आहेत म्हणून ते त्यांच्यावर टीका करत आहेत, असंही त्या म्हणाल्या. तसेच बाळासाहेब ठाकरे आणि त्यांचे विचार वेगळे आहेत. मात्र त्यांच्याविषयी कायमच मनात आदर असल्याचे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील अनेक उद्योग इतर राज्यात पाठवले. यावरून देखील प्रियंका गांधी यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. महाराष्ट्रातील अनेक उद्योग मागिल १० वर्षात दुसऱ्या राज्यात गेले असल्याचा आरोप प्रियंका गांधी यांनी केला.

मागिल १० वर्षापासून राज्यात भाजपचे सरकार आहे. त्यांनी महाराष्ट्राला कमजोर करण्याचे काम केले असल्याचे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे.

# नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करुन राष्ट्रीय कर्तव्य पार पडावे : अशोक शिनगारे

**दि.१६, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ साठी येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान होत आहे. ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या मतदानासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण झाली असून संपूर्ण ठाणे जिल्हा प्रशासन मतदान प्रक्रियेसाठी सज्ज झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी देखील मोठ्या संख्येने मतदान करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर निवडणुकीची कामे युद्ध पातळीवर सुरू झाली. ठाणे जिल्ह्यात १३४ भिवंडी ग्रामीण, १३५ शहापूर (अ.ज.), १३६ भिवंडी पश्चिम, १३७ भिवंडी पूर्व, १३८ कल्याण पश्चिम, १३९ मुरबाड, १४० अंबरनाथ, १४१ उल्हासनगर, १४२ कल्याण पूर्व, १४३ डोंबिवली, १४४ कल्याण ग्रामीण, १४५ मिराभाईंदर, १४६ ओवळा माजिवडा, १४७ कोपरी पाचपाखाडी, १४८ ठाणे, १४९ कळवा-मुंब्रा, १५० ऐरोली, १५१ बेलापूर या १८ मतदारसंघाचा समावेश आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय १८ निवडणूक निर्णय अधिकारी व १८ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

ठाणे जिल्ह्यातील मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रत्येक मतदारसंघात स्वीपच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली असून निश्चितच याचा परिणाम मतदान वाढीवर होणार आहे.

**सहा मतदारसंघात दोन बॅलेट युनिट:**

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातून एकूण २४४ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यातील १३८ कल्याण पश्चिम, १४० अंबरनाथ (अ.जा), १४१ उल्हासनगर, १४२ कल्याण पश्चिम, १४५ मीरा भाईंदर, १५० ऐरोली विधानसभा या ६ मतदारसंघातील निवडणुकीसाठी रिंगणात असलेल्या उमेदवारांची संख्या जास्त असल्यामुळे या ठिकाणी दोन बॅलेट युनिट असणार आहेत.

**जिल्ह्यात ६९५५ मतदान केंद्रे सज्ज:**

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात एकूण ६८९४ ही मूळ मतदान केंद्रे व ६१ सहायकारी मतदान केंद्रे अशी एकूण ६९५५ मतदान केंद्रे सज्ज झाली आहेत. या मतदान केंद्रांवर एकूण ८२७३ बॅलेट युनिट, ८२७३ कंट्रोल युनिट तर ८९६२ व्हीव्हीपॅट लागणार आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर लागणाऱ्या मशीन्सची सरमिसळही उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधी समक्ष झाली असून मतदान केंद्रावरील सर्व मशीन सीलबंद करण्याची प्रक्रियाही पूर्ण झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.अशोक शिनगारे यांनी दिली.

**जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर ३० हजार ८६८ जणांची नियुक्ती:**

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील ६ हजार ९५५ मतदान केंद्र असून या प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी, एक शिपाई व पोलीस कर्मचारी असे पथक मतदानाच्या दिवशी कार्यरत असणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ६ हजार ९५५ मतदान केंद्रावर एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी १- ७ हजार ७१७, इतर मतदान अधिकारी - १५ हजार ४३४ अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रांवर करावयाची कामे याबाबत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून मतदान केंद्रावरील सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

**मतदान केंद्रांवर सुविधा उपलब्ध:**

मतदारांना मतदान सहजतेने करता यावे यासाठी सर्व मतदान केंद्रे तळमजल्यावर असणार आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय, रांगेत उभे असणाऱ्या मतदारांसाठी खुर्च्यांची सोय, ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हील चेअरची सुविधा, रॅम्पची सोय, वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालये आदी सुविधा करण्यात येणार आहे. तसेच एकाच ठिकाणी अनेक मतदान केंद्रे असल्यास मतदान चिठ्ठीवर विविध रंगाचा वापर करण्यात येणार आहे. जेणेकरुन मतदारांचा मतदान करण्यासाठीचा वेळ वाचणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया नि:पक्षपाती, निर्भयपणे व शांततेत पार पाडाव्यात यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन सज्ज झाले असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.शिनगारे यांनी सांगितले.

# संत नामदेव महाराज जयंतीनिमित्त पंढरपूर ते घुमान रथ, सायकल यात्रेचे पुण्यात उत्स्फूर्त स्वागत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, पुणे :** कार्तिक शुद्ध एकादशी मंगळवार दि १२ नोव्हेंबर २०२४ रोजी संत शिरोमणी नामदेव म हाराज जयंती देशात सर्वत्र धूमधडाक्यात साजरी झाली.

या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे खजिनदार मनोज मांढरे, नाम देव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर, सरचिटणीस डॉ.अजय फ ुटाणे, मुख्य विश्वस्त राजेंद्र पोरे, विश्वस्त वसंतराव खुर्द व समस्त नामदेव शिंपी समाज याचे संयुक्त विद्यमाने संत नामदेव महाराज यांच्या ७५४ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेली श्री क्षेत्र पंढरपूर (म हाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या संत नामदेव महाराज रथ व सायकल वारी मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता श्री क्षेत्र पंढरपूरहून हा सोहळा प्रस्थान झाले व सोलापूर, सातारा जिल्ह्याचा प्रवास करीत बुधवार, दि.१३ रोजी पुणे जिल्ह्यात निरा, जेजुरी, सासवड, हडपसर मार्गे सायंकाळी पुणे शहरात आगमन झाले. समस्त लष्कर शिंपी समाज व नामदेव समाजोन्नती परिषदेच्या वतीने यावेळी उत्स्फूर्त



स्वागत करण्यात आले.

यावेळी नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर, सरचिटणीस डॉ. अजय फुटाणे, मनोज मांढरे, महेश मांढरे, पुणे विभागीय उपाध्यक्ष रणजित माळवदे, जिल्हाध्यक्ष विजय कालेकर, ना स.प. पुणे शहर शाखेचे अध्यक्ष संदीप लचके, सचिव सुभाष मुळे, समन्वयक प्रशांत सातपुते, उपाध्यक्ष सुभाष पांढरकामे, उपाध्यक्ष सोमनाथ मेटे, उपाध्यक्ष कुंदन गोरटे, उपाध्यक्ष अक्षय मांढरे यांचे सह रमेश हिरवे, संजय वैद्य, प्रशांत भोंडवे, प्रकाश शिंदेकर, ज्ञानेश्वर पाटेकर, दिंगबर क्षीरसागर, राहुल सुपेकर, स्वप्निल खुर्द, नितीन लचके, शिवाजी माळवदकर, प्रशांत झनकर, प्रशांत बोबडे, मदन लंगडे, पंकज सुत्रावे, यांच्या सह नामदेव भक्त समाज बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे लष्कर महात्मा गाँधी मार्ग येथील श्री राम मंदिरात चरण पादुका रथ व सायकल वारी आल्या नंतर सीमा नेवासकर, गायत्री लचके, कविता खोले, शोभा मुळे, विजया कालेकर, वंदना म ेटे, रूपा माळवदकर, वंदना मेटे, वर्षा माळवदे, स्वाती लचके, दिपा लचके याच्यासह ना.स प पुणे शहर महिलानी !विठ्ठल विठ्ठल विठ्ठला! या तालावर पाऊलीया नृत्याचा आविष्कार सादर केला. सोहळा प्रमुख सूर्यकांत भिसे यांचे व भजनकरी बांधवांचे ना. स.प.पुणे शहर कार्याध्यक्ष व श्री नामदेव शिंपी समाज पुणे लष्कर समाजाचे अध्यक्ष प्रदिप खोले, संजय लचके, मुरारी हिरवे, अरुण भांबुरे, नितीन भाकरे, अशोक हिरवे, सुजय खोले, अजय कळसकर, राजू बाकरे व समाज बांधव यांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले.

पालखी सोहळा व सायकल वारीची मिरवणूक बुधवार पेठ येथील नामदेव मंदिर येथे आल्यानंतर अध्यक्ष कैलास देवळे, उपाध्यक्ष शैलेश मुळे, ज्ञानेश्वर लखांबे, विशाल भांबुरे, संजय जवंजाळ, गुणेश खोडके यांनी डोक्यावर संत नाम देवांच्या पादुका घेतल्या.

यावेळी जयश्री कालेकर, विजया कालेकर, माधवी भुतकर या महिलांनी ओवाळून व पुष्पवृष्टी करीत स्वागत केल्यानंतर सायकल स्वाराचा सत्कार करण्यात आला. समस्त नामदेव शिंपी दैव मंडळ कसबा पेठचे विश्वस्त रमेश मेहेर व ना.स.प. पुणे शहर शाखा यांच्या संकल्पनेतून पंढरपूर ते घुमाण सायकल स्वाराना प्रोत्साहन देण्यासाठी सायकल वारीत पंढरपूर पासून ते घुमाण पर्यंत

**मेरे बाबा नामदेव का बडा बोल बाला ।**

**देखो, चले घुमान बाबा का मेला।।**

**नामदेव नामदेव बाबाजी नामदेव।। धृ ।।**

हे गीत ऐकवण्यात येत आहे.

# पाटणकरांनी शिक्षणाची गंगा आणली तर देसाईंनी दारु दुकाने बार आणली - सत्यजितसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :**

गद्दारीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात बदनाम झालेला मतदार संघ म्हणजे पाटण म तदारसंघ गद्दाराचे नाव इतिहासात कधीच आदराने घेतले जात नाही. विद्यमान मंत्र्यांनी तालुक्याचा नाही तर मलिदा गँगचा विकास केलेला आहे. पाटण तालुक्यात नवीन कंपनी तयार झाली आहे ती म्हणजे मलिदा कंपनी यांनी केलेला कोणताही रस्ता ७-८ महिनेच टिकतोय टक्केवारीने आसमान गाठलेले आहे.

विक्रमसिंह पाटणकर यांनी डोंगरदऱ्यात संपूर्ण तालुक्यात शाळेचे जाळ निर्माण करताना शिक्षणाची गंगा आणली तर शंभुराज देसाई यांनी तालुक्यात दारु दुकाने बार उभे करण्याचं काम केलं असा घनाघात सत्यजितसिंह पाटणकर यांनी केला. ढेबेवाडी येथे पाटण विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी हिंदुराव पाटील, प्रतापराव देसाई, मधुकर पाटील, उज्वला जाधव, योगेश पाटणकर, मंदाकिनी पाटील, अविनाश जानुगडे, ए. पी. पाटील, रामचंद्र साळुंखे, अंकुशराव मोंडे, पोपटराव खेडेकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना सत्यजित सिंह पाटणकर म्हणाले, तालुक्यामध्ये मोठा उठाव असून ही लढाई धनशक्तीविरोधात जनशक्तीची आहे. पाटण तालुक्याचे सम ाजकारण राजकारण गढूळ झाले असून ते स्वच्छ करायचे आहे. जी मंडळी पाटण मध्ये राहत नाहीत ते म्हणतात सत्यजितसिंह पाटणकर तालुक्यात दिसत नाहीत.

आम्ही स्वाभिमानाची लढाई लढत असून आपण अपक्ष म्हणून लढतोय आपण निवडून आल्यानंतर सत्ता स्थापन होताना जनतेला विचारून आम्ही निर्णय घेऊ. विरोधक दारू मटणाचे आमिष देतील आपले भवितव्य दारू मटणामुळे वाया घालवू नका. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः सत्यजित आहोत असे समजून काम करा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना हिंदुराव पाटील म्हणाले विद्यमान मंत्र्यांचे कार्यकर्ते



हेच कॉन्ट्रॅक्टर झाले आहेत. त्यांनी चांगला कार्यकर्ता तयार करण्याऐवजी कार्यकर्त्याला भ्रष्टाचार करायला शिकवला. तालुक्यातील विद्यमान मंत्र्यांची विकास कामे ही नावापुरतीच आहेत. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हेच त्यांचे सूत्र असून त्यामुळे विकास हे नावच बदनाम झाले आहे. तालुक्यात कसलीही रोजगार निर्मिती झाली नसून तालुक्यात रोजगार निर्मिती फक्त सत्यजितसिंह पाटणकर करू शकतात. तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने सत्यजितसिंह पाटणकर यांचे नेतृत्व उभं करूया त्यांना प्रचंड बहुमताने विजय करून तालुक्याच्या विकासाला गती देऊया असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी दादा साळुंखे, विक्रम पाटील,अजित काळे,अभिजीत कडव, आत्माराम कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पाटण तालुका मतदार संघाचे अपक्ष उमेदवार सत्यजितसिंह पाटणकर यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन जाधव यांनी केले कार्यक्रमास ढेबेवाडी विभागातील ग्रामस्थ महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थितांचे आभार प्रतापराव देसाई यांनी मानले.

# 'वाढवू तिरंग्याची शान, करू राष्ट्रासाठी मतदान' - बाईकरॅली द्वारे मतदारांमध्ये जागृती...

## रॅलीत महापालिका आयुक्त यांचा सहभाग; नांदेडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नांदेड :** 'वाढवू तिरंग्याची शान.. करू राष्ट्रासाठी मतदान', 'मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो', 'वोट करेगा वोट करेगा.. सारा नांदेड वोट करेगा' अशा विविध फलक व घोषणांनी मतदार जागृतीसाठी शनिवार, १६ नोव्हेंबर रोजी काढण्यात आलेल्या सायकल व मोटरसायकल रॅलीला नांदेडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या रॅली मध्ये जवळपास ५० सायकल व ५०० मोटरसायकल बाईक सहभागी होत्या. मतदानाच्या टक्केवारीत वाढ करण्यासाठी, लोकशाही समृद्ध व बळकट करण्याकरिता निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हास्तरीय स्वीप कक्षाच्या नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतून 'स्वीप'अंतर्गत भव्य सायकल व म ोटरसायकल रॅली काढण्यात आली.

या जनजागृती रॅलीस महानगरपालिकेचे आयुक्त तथा जिल्हास्तरीय स्वीप कक्षाचे अतिरिक्त नोडल अधिकारी डॉ.महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, संजय जाधव, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी प्राथमिक सविता बिरगे, शिक्षणाधिकारी योजना दिलीपकुमार बनसोडे,

महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी, म हापालिकेचे कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा फरहतउल्ला बेग, सदाशिव पतंगे, ८७-नांदेड दक्षिण मतदारसंघ स्वीप कक्षाचे प्रमुख रुस्तुम आडे, अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे, एस.जी.जी.एस. अभियांत्रिकी

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी यांच्यासह नांदेड लॉयन्स क्लब, रोटरी क्लब व नांदेड सायकलिस्ट ग्रुप चे सदस्य उपस्थित होते.

जुना मोंढा टॉवर परिसरातून महापालिका आयुक्तांच्या शुभहस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅली ची सुरुवात झाली.



पुढे महावीर चौक - वजीराबाद म ुथा चौक - कला मंदिर - शिवाजीनगर - आयटीआय कॉर्नर - श्रीनगर - वर्कशॉप कॉर्नर मार्गे - भाग्यनगर - आनंदनगर - नागार्जुना हॉटेल कॉर्नर - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - यात्री निवास - चिखलवाडी कॉर्नर मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहचून सर्व सहभागी व्यक्तींनी मतदानाची शपथ घेतली व रॅलीचा समारोप झाला.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढावा.

यासाठी आयोजित रॅलीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या रॅलीत अधिकारी कर्मचाऱ्यांसह विविध मान्यवर नागरिक, विद्यार्थी, म हिला व सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी मतदानाबाबत विविध फलक व घोषणाद्वारे जनजागृती करण्यात आली.

या रॅलीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेचे प्रलोभ कुलकर्णी, महानगरपालिकेचे वरिष्ठ सहाय्यक साईराज मुदिराज,

स्विप कक्षाचे सुनील मुत्तेपवार, माणिक भोसले, सारिका आचमे यांनी परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये कार्तिक मास पौर्णिमेनिमित्त कल्याच्या कीर्तिनाने सांगता

**अक्षराज : उमेश जोशी**



**दि.१५, लातूर :** रेणापुर तालुक्यातील पानगाव येथील प्रचिलीत हेमामंडपंथी प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये शुक्रवार, दिनांक १५ नोव्हेंबर रोजी पौर्णिमे निमित्त कल्याचे कीर्तन ह.भं.प कांतराव पांडे महाराज यांच्या मधुर वाणीतून सांगता करण्यात आली. विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये कार्तिक महिन्यामध्ये रोजी पहाटे विठ्ठल रुक्मिणी मंदिरा मध्ये विठ्ठल रुक्मिकची काकड आरती, धूप आरती व महापूजा करण्यात येते.यावेळी रामवाडी, भंडारवाडी, फावडेवाडी, चुकारवाडी पाथरवाडी, गोविंदनगर, मुसळेवाडी, बागझरी या बाहेर गावातुन भक्त काकड आरती व महापूजेसाठी येतात. कार्तिक पौर्णिमा निमित्त ह.भं.प कांतराव पांडे महाराज यांच्या कल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी उपस्थित ह.भं.प व्यकटराव आरडले, ह.भं.प योजिराज आरडले, तुळशीराम बद्दे, श्रीहरी संपते, साहेबराव सूळ, रणजित कस्तुरे, शिवदास मोठीपल्ले, शिवराज भांडरे, गावातील महिलांच्या उपस्थितीमध्ये कार्तिक पौर्णिमेच्या कल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली.

## विंचूर येथील सभेत भुजबळांची ग्वाही विकासाच्या नवीन पर्वासाठी करू वचनबद्ध प्रवास

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथे आज आयोजित प्रचार सभेत नागरिकांशी संवाद साधला. या सभेत विंचूरच्या जनतेने दिलेल्या विश्वासाने माझ्या विकासाच्या ध्येयाला अधिक बळकटी दिली. प्रत्येक नागरिकाच्या प्रगतीसाठी मी सदैव कटिबद्ध आहे, आणि आजचा पाठिंबा माझ्या कार्यावरची लोकांची निष्ठा अधोरेखित करतो. मागील २० वर्षांत आपल्या येवला-लासलगाव मतदारसंघात पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी, प्रत्येक गावात शाश्वत पाणीपुरवठा, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्याच्या सोयीसाठी भक्कम पावलं उचलली. प्रत्येक घरात पाणी आणि प्रत्येकाला पक्के घर देण्याचा उद्देश असून त्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहे.

मतदारसंघातील नागरिकांसाठी उत्तम रस्ते, नियमित पाणीपुरवठा आणि लोकहिताची विविध कामे साकार करत या भागाला विकासाच्या नव्या उंचीवर नेलं आहे. कोरोना काळात आवश्यक वैद्यकीय सुविधा उभ्या करून, जनतेला संकटात आधार देण्याचा प्रयत्न केला.विंचूरच्या विकासाला नवा आयाम देण्याचा माझा निर्धार आहे. विकासाच्या माध्यमातून प्रत्येक घर आणि प्रत्येक नागरिकाला प्रगतीच्या प्रवाहात सामील करण्याचं माझं वचन आहे. यावेळी महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि विंचूरच्या जनतेने दिलेला पाठिंबा हा विजयाचा विश्वास निर्माण करणारा आहे. तुमच्या सहकार्याने हा विकासाचा प्रवास न थांबता अविरतपणे सुरू राहील असे प्रतिपादन छगन भुजबळ यांनी केले. यावेळी मोठ्या प्रमाणात विंचूर येथील सर्व पदाधिकारी व विंचूर येथील नागरिक उपस्थित होते.

## लोकांच्या हितासाठी आमची शाखा सदैव तत्पर - मोहनलाल माळी

**अक्षराज : राहुल शिंदे**




**दि.१६, पेठवडगाव (कोल्हापूर) :** वडगाव सराफ व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.वडगाव शाखा हेरले प्रथम वर्धापन दिन नुकताच कार्यालयामध्ये उत्साहात पार पडला. वर्धापन दिनानिमित्त संस्था कार्यालयामध्ये सत्यनारायण पूजा आयोजित केली होती. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक डॉ.मोहनलाल माळी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की हेरले व परिसरातील लोकांच्या हितासाठी आमची शाखा सदैव तत्पर राहील. व लोकांच्या आर्थिक विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून पूर्णपणे सहकार्य राहील. सहकाराला सुवर्णाची साथ या ब्रीद वाक्याच्या आधारे संस्था प्रथम वर्षात एक कोटी ठेवी कडे संस्था वाटचाल करत आहे. यावेळी उपस्थित बाळासो पाटील, झाकीर हुसेन मोमीन, सुभाष मेहतर, विश्वनाथ माळी, कुलदीप शेटे, राहुल शेटे, नरहरी कुलकर्णी, दादासो काशीद, सरदार आवळे,तसेच उपस्थितांचे आभार बाळासो पाटील यांनी मानले.

## उरण-करंजा मार्गाची दुरवस्था कायम

**दि.१६, उरण :** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आणि देशातील मोठ्या मच्छीमार बंदराला जोडणाऱ्या उरण ते करंजा मार्गाची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणारे हजारो नागरिक त्रस्त झाले आहेत. या मार्गाचे दुरुस्ती आणि रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून ते लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे. उरण शहर ते करंजा हा चार किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून उरण ते अलिबाग हा जलमार्ग आहे. तर नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छीमार बंदरात दररोज अनेक वाहने वाहतूक करीत आहेत. मात्र मार्गाच्या मधोमध रस्ता खोदण्यात आला आहे. रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी खडी टाकल्याने वाहने त्यात फसून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. अशा प्रकारचा अपघात झाल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या मार्गावरील खड्ड्यांमुळे धुळीचाही त्रास सहन करावा लागत आहे. उरण ते करंजा हा मार्ग जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. मात्र त्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आले आहे. चार किलोमीटर लांबीच्या या मार्गाच्या रुंदीकरण आणि दुरुस्तीसाठी चार कोटींचा निधी मंजूर झाला असून त्याचे काम सुरू आहे, अशी माहिती सा. बां. विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली.